दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
# महावृत्त
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १९३ वा गुरूवार दि.१६ जानेवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.




## भारताची मोठ्या सागरी शक्तीच्या दिशेने वाटचाल- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी
## युद्धनौका, विनाशिका आणि पाणबुडी एकाच वेळी राष्ट्राला समर्पित

मुंबई: निलगिरी युद्धनौका, सूरत विनाशिका आणि वाघशीर पाणबुडीचे लोकार्पण ही नौदलाच्या गौरवशाली परंपरेला भविष्यातील आकांक्षेशी जोडणारी ऐतिहासिक घटना आहे. यामुळे भारताची वाटचाल मोठ्या सागरी शक्तीच्या दिशेने सुरू असून भारताच्या सुरक्षा आणि प्रगतीला मोठे सामर्थ्य प्राप्त झाले असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितले. भारतात निर्मित सूरत आणि निलगिरी (युद्धनौका) तसेच वाघशीर (पाणबुडी) या तीन महत्वाच्या नौका मुंबईतील नेव्हल डॉकयार्ड येथे झालेल्या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते राष्ट्राला समर्पित करण्यात आल्या. राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, नौसेना प्रमुख दिनेशकुमार त्रिपाठी यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित होते. प्रधानमंत्री श्री.मोदी म्हणाले की, संपूर्ण विश्व हा परिवार मानून भारत विकासाच्या भावनेने काम करतोय. तीन आघाडीच्या लढाऊ जहाजांचा नौदलामध्ये समावेश एक मजबूत आणि स्वावलंबी संरक्षण दल निर्माण करण्यासाठी भारताची अटल वचनबद्धता अधोरेखित करते. भारतीय समुद्र क्षेत्रात भारत प्रथम प्रतिसादकर्ता म्हणून उदयास आला आहे. नौदलाने अनेकांचे जीव वाचवले आहेत आणि राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मालवाहतूक सुरक्षित केली आहे. यामुळे जगभरातून भारतावर विश्वास वाढला असून आज जागतिक स्तरावर, विशेषत: 'ग्लोबल साउथ'मध्ये भारत एक विश्वासार्ह आणि जबाबदार भागीदार म्हणून ओळखला जातो. तीन युद्धनौकांचे राष्ट्रार्पण सैन्याबरोबरच आर्थिक दृष्टीने सुद्धा महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. जमीन, पाणी, हवा, खोल समुद्र किंवा अनंत अवकाश अशा सर्वच क्षेत्रात भारताने आपले हित जपून तिनही सेनादलांच्या माध्यमातून मागील काही वर्षात आत्मनिर्भर बनण्याची प्रशंसनीय वाटचाल सुरू ठेवली आहे. एकाच वेळी विनाशिका, युद्धनौका आणि पाणबुडी कार्यान्वित होत असल्याने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पवित्र भूमीवर भारतीय नौदलाने स्वावलंबी होण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असल्याचे प्रधानमंत्री श्री.मोदी यांनी यावेळी नमूद केले. भारतीय सैनिकांना आता भारतीय युद्ध सामग्री उपलब्ध होत असून १०० हून अधिक देशांना संरक्षण सामग्री निर्यात केली जात आहे. या माध्यमातून 'मेक इन इंडिया' योजनेचा विस्तार होत असून आर्थिक प्रगतीचे दार उघडून भारताच्या तिसऱ्या मोठ्या अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करण्याच्या प्रक्रियेत मोठा हातभार लागत असल्याचे गौरवोद्गार प्रधानमंत्री श्री.मोदी यांनी काढले. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग म्हणाले की, एकाच वेळी तीन युद्धनौका राष्ट्राला अर्पण होत असल्याने भारतीय समुद्री क्षेत्रात देशाची ताकद आणि महत्व वाढले आहे. या क्षेत्रातून मोठे व्यापार होत असून संरक्षण क्षेत्रात भारत आत्मनिर्भर होत आहे. आधुनिकीकरणावर भर देण्यात येत असून या तिनही नौका त्यादृष्टीने सक्षम असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. नौदल प्रमुख डमिरल श्री. त्रिपाठी यांनी नौदलासाठी गौरव आणि प्रतिष्ठेचा दिवस असल्याचे सांगून या निमित्ताने शक्ती, क्षमता आणि आत्मनिर्भरता साजरी केली जात असल्याचा उल्लेख केला.

युद्धनौकांविषयी थोडक्यात

आयएनएस सूरत – हे प्रकल्पातील चौथे आणि अंतिम जहाज आहे असून जगातील सर्वात मोठ्या आणि अत्याधुनिक विनाशिकांपैकी एक आहे. या जहाजामध्ये ७५ टक्के स्वदेशी घटक असून यात अत्याधुनिक शस्त्र–संवेदक प्रणाली आणि प्रगत नेटवर्क–केंद्रित क्षमता आहेत. आयएनएस वाघशीर – स्कॉर्पीन प्रकल्पातील ही सहावी आणि अंतिम पाणबुडी आहे. ही भारताच्या पाणबुडी बांधणीतील वाढत्या कौशल्याचे प्रतिनिधित्व करते. फ्रान्सच्या नेव्हल ग्रुपच्या सहकार्याने ही तयार करण्यात आली आहे.

## फक्त मुंडेंवरच अन्याय का? असा सवाल करत राऊतांची टीका

मुंबई : एकीकडे बुधवारी (१५ जानेवारी) पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मुंबई तसेच नवी मुंबईच्या दौऱ्यावर आहे. तर, दुसरीकडे बीड खंडणी प्रकरणात संशयित आरोपी वाल्मिक कराडवर मकोका लावल्यानंतर परळीमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे मंत्री धनंजय मुंडे हे परळीमध्ये आहेत. यासंदर्भात पत्रकार परिषदेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांना, पंतप्रधान मोदी महायुतीच्या नेत्यांची भेट घेत असताना धनंजय मुंडे यांना मुद्दाम यापासून लांब ठेवले जात आहे का? असे विचारल्यावर ते म्हणाले की, फक्त धनंजय मुंडे यांच्यावरच हा अन्याय का? अजित पवार, हसन मुश्रीफ यांच्यासह असे अनेक मंत्री आहेत, ज्यांच्यावर स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आरोप केले होते.

## माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी आशियाना निवासस्थानी आलेल्या मान्यवरांशी साधला संवाद

### मकर संक्रांतीच्या निमित्ताने तिळगुळ देवुन दिल्या शुभेच्छा



लातूर / प्रतिनिधी :–राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांच्या आशियाना निवासस्थानी बुधवारी जिल्हाभरातून आलेल्या मान्यवरांनी दिलीपराव देशमुख साहेब यांची भेट घेवून मकर संक्रांतीच्या निमित्ताने तिळगुळ देवुन पुष्पगुच्छ देवून स्वागत केले त्यावेळी विविध विषयवार चर्चा केली तसेच अन्य सामान्य नागरिक, विविध संस्थांचे पदाधिकारी यांची निवेदन स्वीकारले यावेळी साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील, लातूर बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे उदगीर बाजार समितीचे सभापती शिवाजी हुडे,जिल्हा बँकेचे संचालक सुनिल कोचेटा, पृथ्वीराज शिरसाठ, औसा बाजार समितीचे माजी सभापती राजेंद्र भोसले, धैर्यशील भोसले, प्रकाश देशमुख जाधव सर, साळुंखे सर, मांजरा साखर कारखान्याचे संचालक अशोकराव काळे,विलास साखर कारखान्याचे उपाध्यक्ष रवींद्र काळे संचालक नारायण पाटील,बाळासाहेब बिडवे, रणजित पाटील,बारबोले, अनिल पाटील, शेतकरी संघटनेचे नेते सत्तार पटेल राजेन्द्र मोरे, अरुण दादा कुलकर्णी, राजीव कसबे नवनाथ शिंदे दत्ता पाटील,जिल्हा बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी आर डी शिंदे, मोगरगे, पाटील, गणपतराव बाजूलगे,सचिन शिंदे, ज्ञानेश्वर भिसे, अमोल भिसे, तालुका काँग्रेस अध्यक्ष सुभाष घोडके, मीडिया समन्वयक हरिराम कुलकर्णी, विजय कदम, रमेश देशमुख, संभाजी सुळ, सचिन दाताळ, विश्र्वास पाटील, बालाजी बिराजदार बालाजी साळुंखे, शिवाजी कांबळे, शिवाजी देशमुख, चांदपाशा इनामदार रामदास पवार बालाजी जाधव, ऋषी पाटील यांच्या सह मान्यवर काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

## मातृभाषा हीच खरी निर्मितीची भाषा– डॉ. सुधीर रसाळ यांचे प्रतिपादन




छ. संभाजी नगर /प्रतिनिधी :– मराठी भाषा हिच आपल्या निर्मितीची भाषा आहे.तिला जीवंत ठेवायचे असेल तर तिचा उपयोग प्रत्येक क्षेत्रात केला पाहिजे असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक, साहित्यिक डॉ.सुधीर रसाळ यांनी वसंतराव नाईक महाविद्यालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या कार्यक्रमात केले. डॉ.सुधीर रसाळ यांना नुकताच 'विंदांचे गद्यरूप'या समीक्षा ग्रंथाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला त्याबद्दल वसंतराव नाईक महाविद्यालयात त्यांचा सत्कार करण्यात आला.

वाचन संकल्प महाराष्ट्राचा आणि मराठी भाषा संवर्धनया उपक्रामार्तंगत विद्यार्थी –लेखक वाचन संवाद या उपक्रमांतर्गत डॉ रसाळ बोलत होते.या प्रसंगी डॉ रसाळ पुढे म्हणाले की, मातृभाषा हीच खरी निर्मितीची भाषा आहे; परंतु ती फक्त कागदोपत्रीच अभिजात आहे. मराठी भाषा टिकवायची असेल तर भाषा संवर्धनला आपल्या पासून सुरुवात करावी लागेल. मानवी जीवनाच्या अनेक क्षेत्रात मराठी भाषेचा वापर केला पाहिजे. ज्या क्षेत्रात मराठी भाषेचा वापरली केला जाणार नाही तिथे भाषेचा अंत निश्चित समजावा ,आज इथला मराठी माणूसच मराठी नष्ट करत आहे याचे भान इथल्या मराठी माणसाला झाले तरच मराठीला चांगले दिवस येतील असे मत डॉ.सुधीर रसाळ यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी केले या प्रसंगी डॉ. सुधीर रसाळ यांचे समीक्षा लेखन आणि इतर साहित्यिकांच्या साहित्याची समीक्षा यांचा विस्तृत आढावा डॉ शिंदे यांनी घेतला या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. कमलेश महाजन यांनी केले, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. वीणा कांबळे, श्री विवेक थोरमोटे, प्रा.डॉ.बालाजी जोकरे डॉ. शिवचरण गिरी, डॉ. अमसिद्ध सन्नके, श्री आशिष बोदडे,श्री. सुनीलकुमार सोनगीरे, श्री.नानासाहेब पाटील, ग्रंथालयीन कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या व्याख्यानाचा लाभ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी घेतला.कार्यक्रमाचे आभार श्रीमती सुवर्णा दंडे यांनी मानले

## सार्वजनिक आरोग्य मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांची आमदार अमित देशमुख यांनी घेतली भेट

### लातूर जिल्हा रुग्णालय आणि आरोग्य सुविधांच्या मागण्या बाबत आरोग्य मंत्री अनुकुल



लातूर / प्रतिनिधी :–लातूर जिल्हा रुग्णालयाची उभारणी, त्यासाठी आवश्यक असलेल्या जमिनीचा मोबदला देण्यासाठी निधीची तरतूद करणे, यासह लातूर शहर व जिल्ह्यातील आरोग्याचे प्रश्न मार्गी लावण्यासाठीच्या मागणीचे निवेदन महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांना राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मुंबई येथे भेट घेऊन दिले. लातूर जिल्ह्यातील विविध आरोग्य संबंधित समस्या आणि त्यांच्या निराकरणासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबत चर्चा करण्यात आली. या मागण्याबाबत त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत सर्व प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री ना. श्री प्रकाश आबिटकर यांची मंगळवार दि. १४ जानेवारी २५ रोजी मुंबई येथे त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. या भेटीत उभयतामध्ये लातूर जिल्हा रुग्णालयाची उभारणीसाठी आवश्यक असलेल्या जमिनीचा मोबदला देण्यासाठी निधीची तरतूद करणे, यासह लातूर शहर व जिल्ह्यातील आरोग्याचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी चर्चा झाली. लातूर जिल्हा रुग्णालयाच्या उभारणीला गती लातूर येथे मंजूर असलेल्या जिल्हा शासकीय रुग्णालयाचे बांधकाम अनेक वर्षापासून जागेअभावी प्रलंबित होते, या रुग्णालयासाठी कृषी महाविद्यालयाची १० एकर जागा व बांधकामासाठी प्राथमिक आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. मात्र सदरील जागेचा मोबदला न दिला गेल्यामुळे जागेचे हस्तांतरण होऊन बांधकाम सुरू होऊ शकलेले नाही, ही बाब लक्षात घेता कृषी महाविद्यालयास जागेचा मोबदला म्हणून शासकीय नियमानुसार द्यावयाचा ३ कोटी ६८ लाख रुपयाचा निधी त्वरित उपलब्ध करून द्यावा अशी मागणी यावेळी केली, लवकरच सादर केल्या जाणाऱ्या अर्थसंकल्पात सदरील निधीची तरतूद करून तो कृषी महाविद्यालयाकडे वर्ग केला जाईल असे आश्वासन मंत्रीमहोदयांनी यावेळी दिले. जिल्हा रुग्णालयाची उभारणी त्याचबरोबर त्या परिसरात इतर सोयी सुविधा उभारणीबाबतही यावेळी चर्चा झाली. खाजगी रुग्णालयांच्या मागण्यांचाही विचार लातूर शहर आरोग्य सेवेचे केंद्र म्हणून पुढे येत आहे. या परिस्थितीत या शहरातील खाजगी रुग्णालयांच्या वतीने इंडियन मेडिकल असोसिएशनने काही मागण्या शासनाकडे सादर केल्या आहेत त्यास मंजुरी द्यावी अशी विनंती ही याप्रसंगी त्यांच्याकडे केली. खाजगी रुग्णालय परवान्याचे नूतनीकरण दर ३ वर्षा ऐवजी ते दर ५ वर्षांनी करावे, खाजगी हॉस्पिटल मधील मनुष्यबळ नियुक्तीच्या नियमात काही अंशी शिथिलता आणावी यासह आयएमए ने केलेल्या इतर काही मागण्या शासनाकडे प्रलंबित आहेत त्यावर विचार करून त्वरित निर्णय घेण्यात यावा अशी विनंती याप्रसंगी केली. आरोग्यमंत्र्यांसोबतची ही भेट सकारात्मक एकंदरीत सार्वजनिक आरोग्यमंत्र्यांसोबतची ही भेट सकारात्मक वातावरणात पार पडली. यावेळी त्यांच्याकडे सादर केलेल्या सर्व मागण्या सार्वजनिक हिताच्या आहेत त्यामुळे त्यावर त्वरित अनुकूल निर्णय घेण्यात येईल, लातूर जिल्हा रुग्णालयाचे बांधकाम लवकरात लवकर सुरू होईल या दृष्टीने प्रयत्न केले जातील याप्रसंगी अशी ग्वाही महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री ना. श्री प्रकाश आबिटकर यांना राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांना दिली. या भेटीमुळे लातूर जिल्ह्यातील नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा मिळण्याची अपेक्षा वाढली आहे. लवकरच लातूर जिल्हा रुग्णालयाचे बांधकाम सुरू होईल आणि जिल्ह्यातील आरोग्य सेवांचा दर्जा उंचावेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## सौ. विजयमाला कदम कन्या शाळेत चित्रकला, हस्तकला व रांगोळी स्पर्धा संपन्न
## डॉ. पतंगराव कदम जयंती व आ. विश्वजित कदम यांच्या वाढदिवसाचे औचित्य



पुणे / प्रतिनिधी :–पुणे : चित्रकला हस्तकला व रांगोळी प्रदर्शन भारती विद्यापीठाची सौ विजयमाला कदम कन्या प्रशाला एरंडवणे डॉ. पतंगराव कदम यांची जयंती व आमदार विश्वजीत कदम यांच्या वाढदिवसानिमित्त समाज प्रबोधनपर कार्यक्रमा अंतर्गत वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ घेण्यात आला. यावेळी रांगोळी, चित्रकला व हस्तकला या प्रदर्शनाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे जितेंद्र मैड व संगीता येनपुरे यांच्या हस्ते करण्यात आले . रांगोळी मध्ये मुलींचे विषय निसर्ग चित्र यांच्या विषयी रांगोळी का टाकण्यात आलेत. चित्रकला प्रदेशांमध्ये सुंदर रेखाटलेली चित्रे व बॉटल आर्ट ही कला विद्यार्थिनी काचेच्या बाटलीवर वेगवेगळे डिझाईन करण्यात आली आली होती हे प्रमुख पाहुणे यांनी पाहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले यावेळी प्रशालेच्या मुख्याध्यापिका . व प्रमुख पाहुण्यांच्या यांच्या हस्ते दिपप्रज्वलन घेण्यात आले.प्रशालेतील विद्यार्थीनींनी स्वागत गीत आणि भारती विद्यापीठ गीत सादर केले.प्रशालेच्या मुख्याध्यापिका वंदना देशमुख यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय आणि प्रास्ताविक केले. यानंतर सर्व प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी ' कन्याविश्व ' या हस्तलिखिताचे प्रकाशन . प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रशालेत प्रथम आलेल्या कला, क्रीडा, संस्कृती व वार्षिक परीक्षेमध्ये विद्यार्थिनींचा प्रशस्तीपत्र व मेडल देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी लेखक.जितेंद्र मैड यांनी सांगितले की मुलींनी कलेमध्ये सहभागी होऊन आपल्यात अंगे असणारी कला सादर करावी व आपल्या होणाऱ्या अत्याचार हिमतीने विरोध केला पाहिजे. राष्ट्रीय कबड्डीपटू. संगिता येनपुरे यांनी विद्यार्थीनींना सांगितले की प्रत्येक मुलींनी खेळामध्ये सहभागी होऊन आपले कौशल्य दाखवले पाहिजे असे मार्गदर्शन केले. रांगोळी प्रदर्शनाचे नियोजन लता गुरव मीनाक्षी मोरे यांनी केले होते व चित्रकलेचे प्रदर्शन कलाशिक्षक जगदीश कुंभार. रूपाली पाटील शितल विश्वासराव प्रतिभा नाईक चंचला भालचिम यांनी केले होते कार्यक्रमाचे आभार प्रशालेतील ज्येष्ठ शिक्षक बी एस.तुपे यांनी मानले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी सुतार आणि चंचला भालचिम यांनी केले.

## संपादकीय....

# ठोस उपाययोजनांची गरज

जागतिक व्यापार संघटनेच्या माध्यमातून विविध देशांत आंतरराष्ट्रीय करार झाला, त्यास ३० वर्षे लोटली. जागतिकीकरणाची प्रक्रिया त्यानंतरच गतिमान झाली आणि आंतरराष्ट्रीय व्यापारही लक्षणीयरीत्या वाढू लागला. दूरसंचार सेवांचे जाळे, उपग्रह क्रांती आणि इंटरनेट, मोबाईलमुळे व्यापारास बळ मिळाले. आर्थिक महासत्ता असलेली अमेरिका आणि भारत यांच्यातील व्यापार वाढला. बलाढ्य अमेरिकन कंपन्यांनी भारतात गुंतवणूक करण्यास सुरुवात केली. अणुकरारामुळे उभय देशांतील जवळीकही वाढली. ही पार्श्वभूमी एकूणच आर्थिक संबंध आणि त्याचे संदर्भ याबाबतीत तपासून बघणे आवश्यक आहे. अमेरिकेच्या डोक्यावरचे कर्ज ३६ ट्रिलियन डॉलरच्या पुढे गेले आहे. हे प्रमाण त्यांच्या जीडीपीच्या १२५ टक्के आहे. पुढील दशकापर्यंत त्या देशाचे कर्ज ५४ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचेल, असा अंदाज आहे. या कर्जाच्या व्याजापोटी अमेरिकेला रोज दोन अब्ज डॉलर खर्च करावे लागतात. मात्र त्याचवेळी अमेरिकेची अर्थव्यवस्था अधिकाधिक सशक्त होत असून, त्यामुळे तेथे आणखी व्याज दर कपात होण्याची शक्यता मावळली आहे. अर्थव्यवस्थेत प्राण फुंकायचे असतात, तेव्हा व्याज दरांना कात्री लावून व्यापारी व उद्योजकांना स्वस्तात कर्जे उपलब्ध करून दिली जातात. पण डिसेंबर २०२४ मध्ये अमेरिकेच्या रोजगारनिर्मितीत अनपेक्षितपणे वाढ झाली. त्यामुळे आता व्याज दर कपातीची गरज नसल्याकारणाने, जगभरच्या बाजारात खळबळ माजली आहे. अमेरिकी रोख्यांवरील परताव्याचा दरही वाढून, तो ५ टक्क्यांपार गेला आहे. यावरून तेथे व्याज दरात घट अजिबातच होणार नसल्याचे स्पष्ट संकेत मिळतात. म्हणजेच यापुढे अमेरिकेतील म्युच्युअल फंड, वित्त संस्थांना मायदेशातच गुंतवणूक केल्यास त्यावर चांगला परतावा मिळू शकेल. त्यासाठी त्यांना भारतासह विकसनशील देशांतील बाजारपेठांत भांडवल गुंतवणूक करण्याची गरज नाही. एवढेच नव्हे, तर भारतात एफआयआय किंवा विदेशी संस्थागत गुंतवणूकदारांनी जे भांडवल गुंतवलेले आहे, ते हळूहळू वेगाने माघारी घेऊन जाण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे.

विदेशी गुंतवणूकदारांनी जानेवारीतच आतापर्यंत सुमारे २२ हजार कोटी रुपयांतून अधिक समभागांची विक्री केली. भारतातील भांडवली बाजारात सलग चौथ्या दिवशी सुरू राहिलेल्या या घसरणीमुळे सोमवारी सर्वसामान्य गुंतवणूकदारांची सुमारे २५ लाख कोटी रुपयांची मालमत्ता खाक झाली. त्यातच देशांतर्गत अर्थव्यवस्था वाढीचा दर मागच्या चार वर्षातील सर्वात कमी म्हणजे ६.४ टक्के राहील असा अंदाज आहे. भारतातील अनेक कंपन्यांच्या तिमाही कामगिरीने निराशा केली. त्यातच खनिज तेलाच्या आंतरराष्ट्रीय किमती पुन्हा वधारून ८० डॉलरवर गेल्या. डॉलरच्या तुलनेत रुपया गेल्या सोमवारी ८६.५२ च्या पार गेला. केवळ या एकाच दिवशी दोन वर्षांतील सर्वात मोठी म्हणजे ५८ पैशांची किंवा ०.६० टक्के घसरण रुपयांमध्ये झाली. अमेरिकेच्या बाजाराचे पडसाद भारतात तीव्र उमटतात, याचे कारण दोन्ही देशांचे आर्थिक संबंध पूर्वीपेक्षाही अधिक घट्ट झाले आहेत. त्यामुळे सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये दीड-पावणेदोन टक्क्यांची घसरण झाली. सुमारे ५०८ समभागांचे भाव त्यांच्या वार्षिक नीचांकाच्याही खाली कोसळले. परकीय गंगाजळी १० महिन्यांच्या नीचांकी स्तरावर म्हणजे ६३४ अब्ज डॉलरवर आली. रिझर्व्ह बँकेकडून जोपर्यंत ठोस पावले उचलली जात नाहीत, तोपर्यंत ही घसरण सुरू राहील. पण घटलेली परकीय गंगाजळी पाहता रिझर्व्ह बँकेपुढे पर्यायही मर्यादितच आहेत.

अमेरिकेने रशियन तेलावर निर्बंध लादल्यानंतर, कच्च्या तेलाच्या किमती गेल्या तीन महिन्यांतील विक्रम प्रस्थापित करत आहेत. तसेच उत्तर गोलार्धातील थंडी आणि चीनच्या आर्थिक धोरणातील बदलाच्या अपेक्षेनंतर इंधनाच्या मागणीत वाढ झाली. जगभरच्या या आर्थिक भूकंपाचा केंद्रबिंदू अमेरिका असून, डोनाल्ड ट्रम्प हे त्या देशाची सूत्रे लवकरच हाती घेतील. डॉलरला पर्याय शोधण्याचा प्रयत्न करणार्या ब्रिक्स देशांतून होणार्या आयातीवर १०० टक्के कर लादण्याची धमकी ट्रम्प यांनी दिली आहे. ब्रिक्समध्ये भारतासह चीनसारख्या देशांचाही समावेश आहे. ट्रम्प यांनी पहिल्या टर्ममध्ये भारताला अमेरिकन 'हार्ले डेव्हिडसन' मोटारसायकलवरील शुल्क हटवण्यास सांगितले होते. भारतात आयात होणार्या अमेरिकन मालावर अवाजवी शुल्क लादले जाते, ही ट्रम्प यांची तक्रार आहे. भारत-अमेरिकेत २०० अब्ज डॉलरचा व्यापार होतो. ट्रम्प यांनी अमेरिकेत आयात होणार्या भारतीय मालावर अतिरिक्त कर लादल्यास भारताचे मोठे नुकसान होऊ शकते. तसेच खनिज तेलाचे दर भडकल्यामुळे त्याच्या आयातीसाठी आपल्याकडे डॉलरची मागणी वाढली आहे. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या तुलनेत चालू खात्यावरील तूट विक्रमी अशा तीन टक्क्यांपर्यंत जाण्याची भीती आहे.

भारत गरजेच्या ८५ टक्के तेलाची आयात करतो. आयातीवरील खर्च जेवढा वाढतो, तेवढा विदेशी गंगाजळीवरील ताणही वाढतो. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमधील भारताचा चलनसाठाही ४२ दशलक्ष डॉलरने घसरून तो आता सुमारे ५ अब्ज डॉलर इतकाच आहे. देशाच्या विकासात परकीय चलनाचे खूपच महत्त्व असते. देशात परकीय चलन किती आहे, यावरूनच रिझर्व्ह बँकेचे चलनविषयक धोरण ठरत असते. परकीय चलनाच्या साठ्यात घट झाल्यास रुपयाच्या मूल्यातही घट होते. आपल्याकडे मोठ्या प्रमाणात विदेशी चलन असेल, तर विदेशांतून कोणतीही वस्तू आयात करताना समस्या उद्भवत नाहीत. विदेशी गंगाजळीची घागर भरलेली असेल, तर रुपया मजबूत होऊन महागाईही नियंत्रणात राहते. एखाद्या देशाच्या परकीय चलनसाठ्यात सातत्याने वाढ होत असेल, तर ते त्या देशाच्या दृष्टीने सकारात्मक संकेत असतात. आज मात्र जागतिक व भारतीय अर्थव्यवस्थेत काही नकारात्मक संकेत मिळत आहेत. भारताचा विकास दर अपेक्षेप्रमाणे वाढताना दिसत नाही. जीडीपीतील अपेक्षित वाढीचा दर घसरतानाच दिसतो आहे. महागाईचा दरही वाढतो आहे. निर्यात विकासातही अडचणी उत्पन्न होण्याची शक्यता दिसते. केंद्रीय अर्थसंकल्प तोंडावर आहे.

अर्थसंकल्प मांडण्याचा विक्रम नोंदवणार्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन ही कोंडी फोडण्यासाठी कोणते मार्ग अवलंबतात पाहावे लागेल. त्यादृष्टीने ठोस उपाययोजना केल्या जातील, अशी अपेक्षा आहे.

# त्रुटींकडेही गंभीरपणे पाहण्याची गरज



पृथ्वीच्या परिभ्रमणामुळे सूर्याच्या मागील अवकाशाची पार्श्वभूमी बदलते आणि सूर्य वेगवेगळ्या नक्षत्रांमधून जात असल्याचे दिसते. संपूर्ण चक्र १२ भागांमध्ये विभागले गेले आहे. ज्याला राशिचक्र म्हणून ओळखले जाते आणि ज्या दिवशी सूर्य धनू राशीतून मकर राशीत प्रवेश करतो, त्या दिवशी मकर संक्रमण होते.

सूर्याभोवती प्रदक्षिणा घालताना, सूर्याच्या पार्श्वभूमीवर राशिचक्र बदलत असताना पृथ्वीच्या अक्षाचा कल सारखाच राहतो. परंतु, त्यामुळे एक गोलार्ध सूर्यासमोर सहा महिने आणि दुसरा सहा महिने सूर्याच्या मागे राहतो. यामुळे पृथ्वीवरील सूर्यकिरणांचा कोन सतत बदलत राहतो आणि सूर्य सहा महिने उत्तरेकडे आणि सहा महिने दक्षिणेकडे फिरल्याचा आभास देतो. यालाच भौगोलिक भाषेत उत्तरायण आणि दक्षिणायन म्हणतात. मकर संक्रांतीत सूर्याचे दक्षिणायन संपून उत्तरायण सुरू होते. कारण सूर्य धनू राशीतून मकर राशीत प्रवेश करतो. मकर संक्रांतीनंतर, उत्तर गोलार्धात सूर्य उत्तरेकडे जाऊ लागतो आणि हिवाळा कमी होऊ लागतो. भारतासह उत्तर गोलार्धात उन्हाळा वाढू लागतो. हे २१ जूनपर्यंत होते, त्यानंतर सूर्याचे दक्षिणायन सुरू होते.

मकर संक्रांतीनंतर दिवस मोठे होतात आणि रात्री लहान होतात. उत्तर गोलार्धात १४-१५ जानेवारीपर्यंत सूर्यास्ताची वेळ हळूहळू पुढे सरकते. त्यानंतर २१ मार्च ही तारीख येते, जेव्हा दिवस आणि रात्र अगदी समान असतात त्याला इक्विनॉक्स म्हणतात. याचा अर्थ सूर्य जवळजवळ उत्तर गोलार्धाच्या मध्यभागी असतो. सूर्यास्ताच्या वेळेत हळूहळू बदल होणे म्हणजे हिवाळा कमी होतो. त्यानंतर उन्हाळा वाढायला सुरुवात होते. कारण सूर्य उत्तर गोलार्धात जास्त काळ राहणार असतो. पृथ्वी सूर्याभोवती फिरते हे सर्वज्ञात आहे. पण पृथ्वीवरून पाहताना पृथ्वीभोवती सूर्य फिरतो असे भासते. याला सूर्याचे भासमान भ्रमण असे म्हणतात. सूर्य उगवताना ज्या तारकासमूहांच्या पार्श्वभूमीवर तो दिसतो ती जागाही रोज बदलते. एक-दोन दिवसांमध्ये सूर्याच्या स्थानातील बदल फार लक्षणीय नसतो. पण महिनाभरात ही जागा अगदी निश्चितपणे बदललेली दिसते. आणि वर्षभरानंतर सूर्य पुन्हा नेमक्या त्याच तारकासमूहाच्या पार्श्वभूमीवर नेमक्या त्याच जागी दिसू लागतो. या तारखासमूहांना त्यांच्या आकारावरून जी नावे दिली गेली, त्यांनाच आपण राशी म्हणतो. थोडक्यात, वर्षभरात सूर्य या विविध तारकासमूहांमधून भ्रमण करतो आहे, असे भासते म्हणजेच सूर्य विविध राशीमधून प्रवास करत असतो. वर्षभरात सूर्याच्या या भासमान भ्रमणाचा जो मार्ग त्याला 'क्रांतिवृत्त' असे म्हणतात.

वैज्ञानिकदृष्ट्या बोलायचे झाले तर सूर्याच्या उत्तरायणाची सुरुवात खरे तर २१ डिसेंबरला होते, जेव्हा सूर्य दक्षिणायन संपवून उत्तरेकडे सरकायला लागतो. पण भारत आणि उत्तर ध्रुवाच्या दरम्यान असलेल्या देशांमध्ये हा प्रभाव मकर संक्रांतीच्या दिवशी अधिक प्रभावी मानला जातो. ती तारीख १४ किंवा १५ जानेवारी असते. सध्या हा फरक २४ दिवसांचा आहे. तसेच दर वर्षीचा नऊ मिनिटे दहा सेकंद हा काळ साठत साठत जाऊन दर १५७ वर्षांनी मकर संक्रांतीचा दिवस आणखी एक दिवसाने पुढे जातो. दर १५०० वर्षांनी पृथ्वीच्या परिभ्रमणाच्या अक्षात होणार्या बदलामुळे हा फरक दिसून येतो. आजपासून १२०० वर्षांनंतर ही तारीख बदलून फेब्रुवारी महिन्यात येईल. २००१ ते २००७ पर्यंत १४ जानेवारीला मकर संक्रांत येत होती. पण २००८ मध्ये १४ जानेवारीला १२ वा. ७ मिनिटांनी संक्रांत आली, त्यामुळे संक्रांतीचा सण त्याच वर्षी १५ जानेवारीला झाला. दरवर्षी ही वेळ ६ तास ९ मिनिटांनी पुढे सरकते आणि चार वर्षांत ती २४ तास ३६ मिनिटांनी पुढे सरकते. पण, लीप वर्षामुळे ती २४ तासांनी मागे सरकते म्हणजेच दर चार वर्षांनी ती ३६ मिनिटांनी पुढे सरकते. काही वर्षांत संक्रांतीची तारीख पुढे सरकते. सामान्यतः भारतातील सर्व सण हे चंद्राच्या चक्रानुसार असतात. त्यामुळे इंग्रजी दिनदर्शिकेनुसार त्यांच्या तारखा दरवर्षी बदलतात. म्हणूनच होळी, दिवाळीसारखे सण वेगवेगळ्या तारखांना येतात. परंतु मकर संक्रांती हा एकमेव सण आहे, जो सूर्याच्या भासमान भ्रमणावर आधारित असतो.

# दरवर्षी वाहनांच्या संख्येत चार टक्के वाढ

'पुणे तिथे काय उणे'पासून गाजत आलेले तुमचे शहर आता वाहतुकीतील सर्वात मंद (वाहतूक कोंडी) शहरांमधील यादीमध्ये वरच्या स्थानावर आले आहे. बुद्धिमत्ता, संशोधन, उद्योजकतासोबत कासवगतीने चालणारी रहदारी याचा तुम्हाला अभिमान वाटणार आहे. तुम्हाला वाटणार्या अभिमानावर आता शिक्कामोर्तब झाले आहे. मंद वाहतुकीत पुणे शहर जगात चौथ्या क्रमांकावर आणि देशात तिसर्या क्रमांकावर आले आहे याचा जरूर आनंद साजरा करा. गोडधोड करून खा, जमल्यास घरांवर रोषणाई करा आणि शक्य झाले तर घराबाहेर पडून रस्त्यावर थोडे फिरून पाहा. आमचा मुद्दा तुमच्या लक्षात येईल.

नुकत्याच एका संस्थेने केलेल्या सर्व्हेप्रमाणे कोलंबिया या देशातील बरानकीला हे शहर जगातील सर्वात मंद वाहतुकीचे शहर ठरले आहे. येथे १० किलोमीटर अंतरासाठी ३६ मिनिटे लागतात. त्या पाठोपाठ कोलकाता ३४ मिनिटे, बंगळूर ३४ मिनिटे काही सेकंद आणि पुणे अचूक सांगायचे तर ३३ मिनिटे २२ सेकंद लागतात. सद्य परिस्थितीत पुणे शहरातील वाहतूक परिस्थिती पाहता टॉपच्या बरानकीला शहराला गाठण्यास अवघे सहा महिने पुरेसे होतील. वाहतूक कोंडी आणि पुणेकर यांचे नाते घट्ट झालेले असले तरी त्याचा उल्लेख जगाच्या नकाशावर झाला हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

वाहतूक कोंडीची कारणे नेहमीच आहेत आणि गेले किती तरी वर्षे सत्ताधारी पक्ष आणि पुण्याची कारभारी मंडळी यावर शाश्वत उपाययोजना काढण्याचे आश्वासन देत आहेत. वाहनांची वाढती संख्या, अरुंद रस्ते, मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण, नियोजनाचा अभाव अशी असंख्य कारणे वाहतूक कोंडीसाठी सांगितली जातात. स्थलांतरामुळे हजारो लोक आपली वाहने गावाकडून घेऊन पुण्यात येत असतात. त्याचसोबत दरवर्षी वाहनांच्या संख्येत चार टक्के वाढ होत असते हेही महत्त्वाचे आहे.

आम्ही स्वतः बरेचदा पुणे शहरामध्ये दुचाकी आणि चारचाकी चालवत असतो. नेमक्या गर्दीच्या वेळेला ज्येष्ठ नागरिक आपापल्या परीने या वाहतूक कोंडीत भर घालत असतात, असे आमचे निरीक्षण आहे. ज्येष्ठ म्हणजे सेवानिवृत्त होऊन पुण्यामध्ये स्थायिक झालेली ही मंडळी टी शर्ट, जीन्स पँट घालून आपले दुचाकी वाहन घेऊन आजूबाजूच्या परिसरातून दूध, भाजी, किराणा आणणे किंवा नातवंडांना नेऊन सोडणे यामध्ये बिझी असतात. ज्येष्ठ नागरिकांनी सकाळी आणि संध्याकाळच्या वेळी रस्त्यावर येण्याचे टाळले तर बर्यापैकी वाहतूक कोंडी कमी होऊ शकते, असे आमचे व्यक्तिगत मत आहे. ही ज्येष्ठ मंडळी म्हणजे तारुण्य ओसरलेली, परंतु अद्याप वृद्धत्व न स्वीकारलेली मंडळी असतात.

आपण आजही किती ॲक्टिव्ह आहोत, याचा प्रत्यय ते स्वतःलाच रोज देत असतात. वाहतूक पोलिस जागोजागी नेमले तर वाहतूक कोंडी दूर होईल, असे जर कोणाला वाटत असेल तर तो शुद्ध भ्रम आहे हे समजून घ्या. पोलिस यंत्रणा ही नेहमी वाहतूक सुरळीत करण्यापेक्षा शिकार शोधण्यामध्ये व्यस्त असते. बहिरी ससाण्यासारखे त्यांचे डोळे वाहतुकीवर भिरभिरत असतात आणि चूक केलेला कोणी सापडतो का याचा शोध घेत असतात. असे असंख्य लोक त्यांना दररोज सापडतात. संबंधित दुचाकी चालवणार्याला ते आधी गाडी बाजूला घेण्याचा आदेश देतात आणि त्यानंतर किमान १५-२० मिनिटे त्यांची वैचारिक चर्चा होते आणि प्रश्न मिटतो. तोपर्यंत वाहतूक आहे त्या गतीने वाहत असते.

# केज शहराच्या विकासासाठी अहोरात्र तत्पर-हारुणभाई इनामदार

केज/प्रतिनिधी सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ मासाहेब यांच्या संयुक्त जयंती निमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ३४ मान्यवरांना जनविकास परिवर्तन आघाडीच्या वतीने पुरस्कार देऊन केले सन्मानित करण्यात आले.केज शहराच्या विकासासाठी अहोरात्र तत्पर असल्याचे प्रतिपादन हारूणभाई इनामदार यांनी केले आहे. यापुढे शहरातील शंभर बचत गटाला व्यवसायासाठी निधी केज नगरपंचायत च्या माध्यमातून उपलब्ध करणार करणार आहोत असे नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी बोलताना सांगितले आहे. सावित्रीबाई फुले व राजमाता राष्ट्रमाता मासाहेब जिजाऊ यांच्या संयुक्त जयंतीचे औचित्य साधत. जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या संकल्पनेतून समाजातील सामाजिक,राजकीय,सांस्कृतिक, अध्यात्मिक,शैक्षणिक,क्रीडा, वैद्यकीय,प्रशासकीय,पत्रकारिता, उद्योजक, संशोधन, गायन इत्यादी क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ३४ मान्यवरांना जनविकास परिवर्तन आघाडीच्या वतीने पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड तर प्रमुख पाहुणे म्हणून जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारूणभाई इनामदार, गटनेते भाऊसाहेब गुंड, गटनेते राजूभाई इनामदार, नगरसेवक जलालभाई इनामदार, नगरसेवक खैसरभाई इनामदार, नगरसेविका सौ. पद्मिनी अक्का शिंदे,नगरसेविका सौ.पल्लवीताई रांजणकर, नगरसेवक बाळासाहेब गाढवे, नगरसेवक मुस्तफा शेट खुरशी, नगरसेवक युनूसभाई शेख, युवा नेते लखन हजारे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महामानवाच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून धूपदीपाने पूजा करून



दिपप्रज्वलन करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांचे जनविकास परिवर्तन आघाडीच्या व केज नगरपंचायतच्या वतीने शाल,श्रीफळ,पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी शहरातील १० बचत गटाला केज नगरपंचायत च्या पुढाकारातून आयसीसी बँके कडून ८० लाख रुपयांचे कर्ज वाटपाचे पत्र देऊन बचत गटांच्या महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मनोगत व्यक्त करताना हारुणभाई इनामदार यांनी सांगितले की, केज शहरातील अनेक मुख्य रस्त्याचे व गल्लीतील रस्त्याचे कामे करण्यात आली आहेत. त्याचबरोबर बाराशे घरकुल मंजूर करून आणले आहेत दोनशेहून अधिक घरकुलाचे कामे चालू आहेत लाभार्थ्यांच्या खात्यावर पैसे वर्ग करण्यात आले आहेत तर उर्वरित घरकुलांची कामे देखील लवकरच चालू करण्यात येणार आहेत. पुढे बोलताना इनामदार म्हणाले की, केजच्या भूमीमध्ये जन्म घेऊन विविध क्षेत्रांमध्ये अनेक मान्यवरांनी कौतुकास्पद कार्य करून केजची मान उंचावली आहे त्यांचा सन्मान करणे हे आमचे आद्य कर्तव्य आहे म्हणून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला आहे व त्यांचा गुणगौरव करण्याचा आम्हाला योग आला व आमच भाग्य मोठे आहे की, आम्हाला सर्वांची सेवा करण्याचा एक योग आला आहे. केज शहराच्या विकासासाठी आमची जनविकास परिवर्तन आघाडी आम्ही अहोरात्र तत्पर आहोत शहराच्या विकास कामासाठी आम्ही कुठेच कमी पडणार नाहीत असे बोलताना त्यांनी स्पष्ट केले आहे. अध्यक्षीय समारोपप्रसंगी नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड म्हणाल्या की, महिलांनी स्वतःच्या पायावर उभा राहण्यासाठी बचत गटाच्या माध्यमातून विविध व्यवसाय करून स्वतः स्वतःच्या पायावर उभा टाकावे नगरपंचायत च्या माध्यमातून महिलांना बचत गटाच्या माध्यमातून व्यवसाय करण्यासाठी लागणारी सर्व मदत आम्ही करण्यास कटिबद्ध आहोत. महिलांना व्यवसाय करण्यासाठी विविध बँकेचे कर्ज उपलब्ध करण्यासाठी नगरपंचायत सक्षम आहे परंतु महिलांनी कर्जाची परतफेड वेळेत करावी जे बचत गट वेळेत कर्ज फेडतील त्यांना लागेल तेवढे कर्ज उपलब्ध करून देण्यात येत आहे. यापुढे शंभर बचत गटाना नगरपंचायत च्या माध्यमातून कर्ज उपलब्ध करून देणार आहोत. पुढे बोलताना बनसोड म्हणाल्या की, मागील तीन वर्षापासून नगरपंचायतची सत्ता आमच्या हाती आल्यापासून आम्ही केज शहराचा विकास मोठ्या प्रमाणात केला आहे. यापुढेही राहिलेली सर्व कामे पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. जनविकास परिवर्तन आघाडीच्या वतीने प्रा.डॉ. हनुमंत सौदागर प्रा.डॉ.शंकर वाघमारे, प्रा.डॉ.बी.जे. हिरवे, डॉ.ह.भ.प. छत्रभुज वायबसे, पत्रकार रामदास तपसे, तात्या गवळी, दशरथ चवरे, श्रीमती जनाबाई खाडे, प्रा.डॉ. नवनाथ काशीद, अनिल वैरागे, दत्तात्रय मजमुले, सामाजिक कार्यकर्त्या तसलीम शेख, श्रीमती पूजा शिरसाट, श्रीमती संगीता खंडाळे यांच्यासह ३४ मान्यवरांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल पुष्पगुच्छ सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी केज नगरपंचायतचे नगरसेवक, कर्मचारी, पत्रकार बांधव, जनविकास परिवर्तन आघाडीचे पदाधिकारी,कार्यकर्ते आणि बचत गटाच्या महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण, व स्वानंद सार्वजनिक वालनालयाच्या संयुक्त विद्यमाने युवा सप्ताहास प्रारंभ.



केज/प्रतिनिधीआनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण, आनंदगांव ता. केज. जि. बीड व स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंद गांव ता. केज. जि. बीड यांच्या संयुक्त विद्यमाने १२ ते १९ जानेवारी २०२५ या कालावधीत युवा सप्ताह साजरा होत आहे. या निमित्त खास महिलांसाठी विविध सांस्कृतिक, क्रिडास्पर्धा, सामाजिक उपकृम आयोजित केलेले आहेत. १२ जानेवारी २०२५ रोजी राष्ट्रमाता जिजामाता व स्वामी विवेकानंद यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महिला व युवती यांच्या हस्ते जिजामाता व विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले. यावेळी महिला व युवतींनी विविध गीत व उत्स्फुर्त भाषण करून जिजामाता व विवेकानं यांच्या जिवन कार्यावर थोडक्यात विचार व्यक्त केले. दिनांक १३ जानेवारी २०२५ रोजी लंगडी स्पर्धा, अभिव्यक्ती स्पर्धेत सहभता घेवून विविध माध्यमातून उदा. भजन, गळण, अभंग. गीत गायन, भारूड, काव्य वाचन अशा प्रकारे महिला व्यक्त झाल्या. दिनांक १४ जानेवारी २०२५ रोजी ग्रंथप्रदर्शनात सहभाग नोंदवला.

## केज नगरपंचायत कार्यालयाने दिलेले वाईन शॉप नाहरकत रद्द करण्यात यावे-बिअरबार असोसिएशनची मागणी

केज/प्रतिनिधी –केज नगरपंचायत कार्यालयाने दिलेले वाईन शॉप नाहरकत रद्द करण्यात यावे अशी लेखी निवेदनाद्वारे बिअरबार असोसिएशनच्या वतीने केज नगरपंचायत कडे मागणी केली आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, दिनांक २ जानेवारी २०२५ रोजी नगरपंचायत कार्यालयाने वाईन शॉपला नाहरकत दिलेले आहे सदर वाईन शॉपला दिलेले नाहरकत रद्द करण्यात यावे कारण की, केज तालुक्यात मोठ्या प्रमाणावर बिअरबार, बिअर शॉपी व देशी दुकानाची संख्या मोठ्या प्रमाणात झालेली असून त्यांचे अगोदरच अतोनात नुकसान होत असून व्यवसाय बंद करण्याची वेळ आली आहे.

त्यामध्ये आपण दिलेले नाहरकत हे आमच्या असोसिएशनला विचारात न घेता देण्यात आले असून भविष्यात वाईन शॉपला नाहरकत देता वेळी आमच्या असोसिएनला विचारात घेऊन वाईन शॉपला नाहरकत देण्यात यावे असे लेखी निवेदनात म्हटले आहे. या निवेदनावर असोसिएशनचे अध्यक्ष श्रीहरी जाधव, उपाध्यक्ष शंकर तपसे, कोषाध्यक्ष अमोल पोपळे, सचिव विलास सोनवणे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. सदर मागणीचे निवेदन हे नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड व जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार यांना देण्यात आले आहे.



वाईन शॉपला नाहरकत देण्याची प्रक्रिया पूर्ण केलेले नाही.

सदर नाहरकत देतेवेळी केज नगरपंचायतच्या लोकप्रतिनिधी यांना विचारात न घेता व त्यांना सदर प्रकरणी कसल्याच प्रकारची माहिती न देताच परस्पर सदर वाईन शॉपला नाहरकत देण्यात आले आहे.

सदर प्रकरणच्या विरोधात वेगवेगळे निवेदनाद्वारे हरकती कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत.

सदर वाईन शॉपला नाहरकत देण्याची प्रक्रिया (प्रोसेस कम्प्लीट) न केल्यामुळे व सदर हरकतीच्या आधारे मीटिंगमध्ये जनरल बॉडी समोर ठराव मांडून एक मताने मंजूर करण्यात आला आहे. नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड व हारुणभाई इनामदार यांनी आमच्या प्रतिनिधीशी चर्चा करताना माहिती दिली.

## उदगीर येथे कावळ्यांचा मृत्यू; उपाययोजनांसाठी शीघ्र कृती दल स्थापन

लातूर, दि. १५: उदगीर शहरात कावळ्यांच्या अनपेक्षित मृत्यूच्या घटनेची तातडीने दखल घेत मृत कावळ्यांचे वैद्यकीय नमुने औंध येथील राज्यस्तरीय पशुरोग निदान प्रयोगशाळेकडे पाठविले आहेत. याबाबतचा वैद्यकीय तपासणी अहवाल प्राप्त होताच पुढील आवश्यक कार्यवाही केली जाणार आहे. या अनुषंगाने उपाययोजना करण्यासाठी जिल्हास्तरावर शीघ्र कृती दल स्थापन करण्यात आले आहे. तसेच जिल्हा नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. तसेच जिल्ह्यात इतरत्र कोणत्याही पशुपक्ष्यांच्या अनपेक्षित मृत्यूच्या घटना आढळून आल्यास त्वरित नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याच्या प्रमुखाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. श्रीधर शिंदे यांनी केले आहे.

उदगीर शहरातील महात्मा गांधी उद्यान व हुतात्मा स्मारक नगर परिषद वाचनालय परिसरात १३ जानेवारी रोजी २८ कावळे मृतावस्थेत आढळले. उदगीर तालुका पशुवैद्यकीय चिकित्सालय येथील सहाय्यक पशुसंवर्धन आयुक्त डॉ. पांडे यांनी तात्काळ मृत कावळ्याचे वैद्यकीय नमुने राज्यस्तरीय पशुरोग निदान प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठवले आहेत. १४ जानेवारी रोजी आणखी ८, तर १५ जानेवारी रोजी ५ कावळे मृतावस्थेत आढळले. यामुळे एकूण मृत कावळ्यांची संख्या ४१ झाली आहे. या सर्व कावळ्यांची वैज्ञानिक पध्दतीने विल्हेवाट लावण्यात आली आहे.

जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. श्रीधर शिंदे, लातूर विभागीय पशुरोग निदान प्रयोग शाळेचे पशुसंवर्धन सहाय्यक आयुक्त डॉ. मनोज घाटे, पशुसंवर्धन सहाय्यक आयुक्त डॉ. एस. आर. साळवे यांच्या पथकाने १५ जानेवारी रोजी घटनास्थळी भेट देत परिस्थितीची पाहणी केली. तसेच उदगीर तालुक्यातील सर्व पशुसंवर्धन अधिकारी व कर्मचाऱ्यांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. रोग प्रादुर्भाव नियंत्रणासाठी पीपीई किट्स, ग्लोव्हज, सॅनिटायझर यांचा वापर अनिवार्य करण्यात आला आहे.

औंध येथील प्रयोगशाळेतून नमुना निदान अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील उपाययोजना करण्यात येणार आहेत. तसेच लातूर जिल्ह्यात इतरत्र पशुपक्ष्यांमध्ये कोणत्याही प्रकारची अनपेक्षित मृत्यूची घटना आढळल्यास नागरिकांनी त्वरित नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखाना प्रमुखांशी सपर्क साधावा. अफवांवर विश्वास ठेवू नये आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन डॉ. शिंदे यांनी केले आहे.

# महाराष्ट्राच्या आदिवासी होळी नृत्याची यावर्षीच्या प्रजासत्ताक दिनी होणार प्रस्तुती

## युनिव्हर्सल ट्राइब्सचे प्रमुख रजत रघतवान यांची माहिती

पुणे : भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाद्वारे आयोजित ' जय माँ भारती नृत्य उत्सव' अंतर्गत यावर्षीच्या प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये महाराष्ट्राच्या आदिवासी होळी नृत्याची प्रस्तुती केली जाणार असल्याची माहिती युनिव्हर्सल ट्राइब्सचे प्रमुख रजत रघतवान यांनी पुण्यात दिली. हा उपक्रम कर्तव्य पथावर भारताच्या संतकुटीक विविधता आणि समृद्धतेचे राष्ट्रीय स्तरावर दर्शन घडविण्याचा एका महत्वपूर्ण प्रयत्न असल्याचे रजत रघतवान यांनी सांगितले. सदर नृत्य महाराष्ट्राच्या नंदुरबार जिल्ह्यातील पावरा भिल्ल – कोळी समुदायातील कलाकारांकडून सादर केले जाणार आहे. या नृत्याची निवड संगीत नाटक अकादमी, दिल्ली आणि भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाने केली आहे. निवड प्ररकीय नकासी एंटरटेनमेंटचे सुभाष नकासे ,आदर्श मित्र मंडळ आणि गिनीज बुक विक्रमवीर उदय जगताप आणि प्रसिद्ध प्रेरणादायक वक्ते गणेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली आहे. नृत्य दलाचे व्यवस्थापन आणि समन्वय रजत रघतवान यांनी केले आहे. या दलामध्ये ५० कलाकार सहभागी आहेत आणि या गटाचे नेतृत्व केशव खर्डे पाटील करणार आहेत.






सदर नृत्य दल ३० डिसेंबर २०२४ रोजी दिल्लीला पोहचले असून त्यांनी परेडच्या तयारीसाठी एक महिन्याचा सर्व पूर्ण केला आहे. पहिल्यांदाच एका आदिवासी नृत्य दलाला प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये सादरीकरणाचा सन्मान मिळाला आहे. या ऐतिहासिक संधीमुळे महाराष्ट्राच्या सातपुडा क्षेत्रात आणि पावरा भिल्ल – कोलो समुदायात अभिमान आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये युनिव्हर्सल ट्राइब्स कंपनी आणि कंपनीचे संस्थापक रजत रघतवान यांचे विशेष योगदान आहे. रजत रघतवान यांनी आदिवासी कलाकारांना राष्ट्रीय स्तरावर मंच मिळवून देण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यांच्या प्रेरणेने आणि मार्गदर्शनाने नृत्य दलाचे मनोबल उंचावले आहे. तसेच त्यांच्या सांस्कृतिक ओळखीला राष्ट्रीय मंचावर सादर करण्याचा मार्ग मोकळा केला आहे. या यशाचे श्रेय संगीत नाटक अकादमीच्या अध्यक्षा डॉ.संध्या पुरेचा , भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाचे सचिव राजू दास, रजत रघतवान यांच्या सततच्या सहकार्याला आहे. ही प्रस्तुती केवळ भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडवणार नाही तर रजत रघतवान यांच्या प्रयत्नांमुळे आदिवासी समुदायासाठी प्रेरणा आणि सक्षमीकरणाचे प्रतीक ठरणार आहे.

# ३ रे फातिमाबी शेख ग्रामीण मुस्लीम मराठी साहित्य संम्मेलनात प्रबोधनकार कु. डॉ.वैभवी कांबळे घारगावकरला युगस्त्री फातिमाबी शेख पुरस्काराने सन्मानीत



लातूर :– ३ रे फातिमाबी शेख ग्रामीण मुस्लीम मराठी साहित्य संम्मेलनात प्रबोधनकार कु.डॉ.वैभवी कांबळे घारगावकरला युगस्त्री फातिमाबी शेख पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.यावेळी खा.डॉ.काळगे ,ऊस्मान शेख,अॅड.हाशम पटेल,माजी प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार ,जेष्ट कवि प्रा.फ.म.शहाजिंदे ,आशा भिसे,आणि प्रतिष्ठीत मान्यवरांच्या हस्ते शॉल,फुलहार,सन्मानप ,पुष्पगुच्छ देवुन सन्मानीत केले.कारण वैभवीने डॉक्टरकीचे शिक्षण घेत भारताच्या आदर्श महामाता राष्ट्रमाता जिजाऊ,राजमाता अहिल्यादेवी,ज्ञानज्योती सावित्री,त्यागमुर्ती रमाई,पहिली डॉक्टर आनंदी जोशी,यांच्या जिवनावरती येकपात्री येकांकिकेचे विक्रमी तब्बल २८२नाट्यप्रयोग अगदी निशुल्क प्रवासभाडे घेवुन आणि समाज संयोजक देईल ते बक्षीस घेवुन या महामातेचे विचार पेरणीचे कार्य करत ती आपले डॉक्टरकीचे शिक्षण पुर्ण करत आहे.आणि तिला समाज भरभरुन नेहमी साडीचोळी,फुलहार,शॉल,स्मृतिचिन्ह,सन्मानपत्र,अ र्थीक बक्षीस देवुन वन्समोर असे नेहमी कार्यक्रम सादर करते.आणि तिचा दावा आहे कि,आपल्या देशाचे स्त्रीधन समृद्ध,सक्षम,सुरक्षीत,निर्भय आणि सन्मानीत केवळ या आदर्श महामाताच्या विचारानेच होणार आहे.आणि व्यसनमुक्त समृद्ध मानवी मन यातुनच घडणार आहे.म्हणुन ती सुट्ट्यानमध्ये नेहमी अप्रतीम नैसर्गीक अभिनयातुन साक्षात महामातांचेच दर्शन श्रोत्यांना प्रेक्षकांना देवुन आचंबीत करत अनेक लोंकांना व्यसनातुन मुक्त केले आहे.म्हणुन तिचा येथे साहित्यसंमेलनाच्या संयोजकांनी सन्मानीत केले नि पुन्हा ऊर्जीत केले आहे.जनहितार्थ सदरील वृत्तआपल्या नामांकीत लोकप्रीय वृत्तपत्रातुन प्रकाशीत करुन सहकार्य करावे हीच विनंती.आपला विलास घारगावकर.मकर संक्रांतीच्या हार्दीक हार्दीक शुभेच्छा.यासाठी वैभवीचे अभिनंदनकै.वसंतराव काळे बी एच एम एस मेडीकल कॉलेज,श्रावस्ती बुद्ध विहार परिवार, बळीराम सुर्यवंशी,विष्णुपंत क्षिरसागर,प्राचार्य डॉ.चरणदास कांबळे,प्रा. निता करवंजे,प्रा.डॉ.दिवाकर करवंजे,प्राचार्य डॉ. संजय गवई,प्रा.डॉ.सुधीर भीमकर,देविदासबाबा आचार्य,संजीवणी गडेराव,ऊत्तमराव घोडके,भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष मच्छींद्र बलांडेसुधाकर हातागळे,गुरुजी,प्रा.बापुसाहेब गायकवाड,कांताबाई कांबळे,सुनिता शिराढोणकर,शांतिप्रिया सुर्यवंशी,प्रेमनाथ जोगदंड,विलास सोनवणे,मेजर वसंत कांबळे यांनी अभिनंदन केले.

# विश्वधर्मी प्रा. डॉ विश्वनाथजी कराड यांच्या जन्मदिनानिमित्त यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयात वीस दिवसीय आरोग्य सुरक्षा महाशिबीर

## सर्व प्रकारच्या रुग्णांनी लाभ घ्यावा –कार्यकारी संचालक आ. रमेशआप्पा कराड





लातूर / प्रतिनिधी :– माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड यांच्या जन्मदिनानिमित्ताने लातूर एमआयटी वैद्यकीय महाविद्यालय आणि यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने १५ जानेवारी ते ५ फेब्रुवारी दरम्यान वीस दिवस आरोग्य सुरक्षा महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचा सर्व प्रकारच्या रुग्णांनी मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा असे आवाहन एमआयटीचे कार्यकारी संचालक आ. रमेशआप्पा कराड यांनी केले आहे.

तळागाळातील गोरगरीब लाखो विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा ध्यास घेतलेले एमआयटी शिक्षण समूह पुणे आणि विश्वशांती केंद्र आळंदी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड यांचा येत्या ३ फेब्रुवारी रोजी जन्मदिवस असून यानिमित्ताने लातूर येथील एमआयटी वैद्यकीय महाविद्यालय आणि यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने सलग वीस दिवस सर्व प्रकारच्या रुग्णांसाठी मोफत वैद्यकीय तपासणी व उपचाराकरिता आरोग्य सुरक्षा महाशिबिराचेआयोजन करण्यात आले आहे. असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, विविध प्रकारच्या रुग्णसेवेसाठी एमआयटीच्या ग्रामीण रुग्णालयासह लातूर शहरातील विविध भागासह लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या कार्यक्षेत्र विविध ठिकाणी सर्व रोग निदान शिबिराचे नियोजन करण्यात येत आहे.

गेल्या ३४ वर्षापासून एमआयटी वैद्यकीय महाविद्यालय आणि यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने विविध प्रकारच्या रुग्णांना अविरत सेवा देण्यात येत आहे. या रुग्णालयात सर्व प्रकारच्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ७५० खाटा उपलब्ध असून रुग्णालयात सर्व प्रकारच्या सुपर स्पेशलिटी सेवा सह १२ ऑपरेशन थिएटर अद्यावत प्रयोगशाळा २४ तास रक्तपेढी व अपघात विभाग कार्यरत आहे.

आरोग्य सुरक्षा महाशिबिर अंतर्गत रुग्णालयाच्या वतीने सर्वसामान्य शास्त्रक्रिया, हाडांच्या शस्त्रक्रिया, महात्मा फुले योजनेअंतर्गत सर्व तपासण्या, कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया, कान नाक घसा वरील सामान्य शस्त्रक्रिया व उपचार, छातीचे आणि त्वचेचे आजार व उपचार प्रस्तुती सेवा व सिझेरियन शस्त्रक्रिया औषधासह यासह विविध आजारावर पूर्णपणे मोफत उपचार केले जाणार असून आयसीयू, एनआयसीयु उपचार व तपासणी सिटीस्कॅन, एमआरआय, मेंदूरोग, यकृत, जठर रोग, कॅन्सर व मुतखड्यावरील तपासणी उपचार शस्त्रक्रिया, दुर्बिणीद्वारे विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया व्यंध्यत्व निवारण तपासणी उपचार, प्लास्टिक सर्जरी हृदयरोग व मधुमेह उपचार अधिक सुविधा माफक दरात दिल्या जाणार आहेत. तेव्हा सर्व प्रकारच्या रुग्णांनी आरोग्य सुरक्षा महाशिबीराचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा असे आवाहन एमआयटीचे कार्यकारी संचालक आ. रमेशआप्पा कराड, एमआयटी मेडिकल कॉलेजचे अधिष्ठता डॉ. एन. पी. जमादार यांनी केले आहे.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेत राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद जयंती साजरी.

केज/प्रतिनिधी राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संपत्ती सरवदे व मुख्याध्यापक श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी प्रतिमा पुजन करुन पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्ष इ.७ वीची विद्यार्थिनी प्रियंका अशोक देटे व प्रमुख पाहुणे म्हणून इ.६ वीची विद्यार्थिनी श्वेता सुहास सरवदे, नेहा सतिश माने या होत्या.राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा येथील भुईकोट राजवाड्यात झाला.वडील लखुजी जाधव व आई म्हाळसादेवी ऊर्फ गिरजाबाई हे होत. त्या छत्रपती शिवाजी राजे भोसले यांच्या आई व शहाजी राजे भोसले यांच्या पत्नी होत्या.हिंदवी स्वराज्य निर्मिती करण्यात त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना उपदेश दिला व वेळोवेळी मार्गदर्शन केले.स्वामी विवेकानंदांचा जन्म कोलकाता येथे १२ जानेवारी १२३६ रोजी झाला.वडील विश्वनाथ दत्त होते व आई भुवनेश्वरी दत्त होत्या.ते रामकृष्ण परमहंस यांचे शिष्य होते.त्यांचे मुळ नाव नरेंद्र होते.त्यानी हिंदु धर्माबाबत विशेष माहिती अमेरिकेत पटवून हिंदु धर्माचे श्रेष्ठत्व पटवून दिले.युवकांना विशेष मार्गदर्शन केले.अशी माहिती या शाळेचे मुख्याध्यापक श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी दिली.विद्यार्थ्यांनी, विद्यार्थ्यिनिंनी,शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संपत्ती सुदाम सरवदे, उपाध्यक्ष सीमा सुधीर मोहिते,सदस्य, तरनळी ग्रामपंचायत सरपंच महादेव खेडकर , उपसरपंच शिवाजी मोहिते,राधा आक्का खामकर, शिक्षक भारत बाबुराव हांगे, बाळासाहेब भिल्लु राठोड, बाबासाहेब राजाराम मैंद,शिक्षिका श्रीमती गिताताई जीवराज अंडील मॅडम, श्रीमती सोनाली भारतराव भुमकर मॅडम,शापोआ कामगार गणेश काशिनाथ माने हे उपस्थित होते.राजमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या वेषात विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन इ.७ वीची श्रध्दा संपत्ती सरवदे यांनी केले व इ.६ वहीची श्वेता सुहास सरवदे यांनी कार्यक्रमास उपस्थितांचे आभार मानले.या शाळेतील शिक्षिकांना श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम अपग्रेड मुख्याध्यापक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी केंद्र लव्हुरी ता.केज यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन व विद्यार्थ्यांना, सर्व उपस्थितांना गोड पदार्थ खाऊ म्हणून वाटप केला व कार्यक्रम संपन्न झाला.

# नवी मुंबईतील सुरक्षा अभियानास जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद







नवी मुंबई / के.एच.हनवते :– आपला माणूस दिलीप किसनराव आमले व्यसनमुक्ती जनजागृती यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई विभागातील अनेक ठिकाणी रस्ता सुरक्षा अभियान राबवले यावेळी प्रादेशिक परिवहन अधिकारी सौ हेमांगिनी पाटील मॅडम ठाणे जिल्हा (आरटीओ) नवी मुंबई पोलीस उपआयुक्त तिरूपती काकडे , ब्रह्मानंद नाईकवाडी साहेब वरिष्ठ पोलीस निरीक्षक नेरूळ, सौ मोहिनी लोखंडे मॅडम पोलीस निरीक्षक, सिवुड सतिश जाधव वरिष्ठ पोलीस निरीक्षक तुर्भे यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली उपप्रादेशिक परिवहन नवी मुंबई दत्तात्रेय सांगोलकर , गजानन गावंडे सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या व अंकिता मोटर ट्रेनिंग स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई महानगरपालिका शाळा येथे रस्ता सुरक्षा व व्यसनमुक्ती जनजागृती प्रमुख मार्गदर्शक धीरज पवार मोटार वाहन निरीक्षक परिवहन विभाग, मा हनुमान गलांडे वाहतूक अधिकारी, दयानंद महाडेश्वर वाहतूक विभाग आयोजक आपला माणूस दिलीप किसनराव आमले व्यसनमुक्ती जनजागृती विशेष सहकार्य माधुरी नारखेडे मुख्याध्यापिका व शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका व २०० पेक्षा जास्त मुलं व मुली या कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला यावेळी पवार यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना वाहतूक नियम प्रश्न विचारले योग्य उत्तर देणाऱ्या विद्यार्थ्यास पॅड तसेच शालेय सामान बक्षीस रूपाने वाटप कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य अंकिता मोटर ट्रेनिंग स्कूल शिव वाहतूक सेना, व्यसनमुक्ती जनजागृती गेल्या अनेक वर्षांपासून धार्मिक कार्यक्रमातुन हेल्मेट तसेच वाहतूक नियमांचे पुस्तक वाटप करून आपला माणूस दिलीप किसनराव आमले रस्ता सुरक्षा व व्यसनमुक्ती जनजागृती अभियान राबवित आहेत.

# रमाई, प्रधानमंत्री आवास यौजनेचे अनुदान देतेवेळी टॅक्स भरणा अट शिथिल करून,वाढीव ५ लाख रुपये अनुदान देण्यात यावे.

## लोक प्रहार संघटनेचे मनपा आयुक्त यांना निवेदन



लातूर / प्रतिनिधी :– रमाई घरकुलाचे व प्रधानमंत्री आवास यौजनेचे अनुदान त्वरित लाभार्थी यांना देण्यात यावे.लातुर शहर मनपा तर्फे रमाई घरकुलाचे अनुदान टॅक्स भरणा केल्यानंतरच हफ्ता दिला जाईल अशी लावलेली अट रद्द (शिथिल) करून त्यात *टॅक्स भरण्यासाठी सवलत द्यावी. लाभार्थी यांना त्वरीत हफ्ते देण्यात येऊन, *वाढीव निधी ५ लाख रुपये करण्यात यावा. अशा मागणीचे निवेदन लोक प्रहार संघटनेतर्फे मनपा आयुक्त यांना देण्यात आले आहे. वअगोदर दिलेल्या निवेदनाचा संदर्भ देण्यात येऊन महाराष्ट्र राज्य चे मुख्यमंत्री,संमाजकल्याण मंत्री, जिल्हाधिकारी लातूर, संमाजकल्याण आयुक्त लातूर यांना निवेदनाच्या प्रति पाठविण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र राज्य सरकार मार्फत रमाई घरकुल आवास योजना व प्रधानमंत्री आवास यौजना राबविण्यात येते. गरिबाना आपले हक्काचे पक्के घर बनविण्यासाठी शासनामार्फत अडीज लाख रुपये इतका निधी दिला जातो. परंतु या निधी मध्ये आज घर बांधणे अवघड झाले आहे. वाढती महागाई, वाढलेले सळई, सिमेंट, मजुरी, वाळू, खडी,कच व वाहतूक खर्च यामुळे गरिबाना इतक्या तुटपुंज्या निधित घर बांधणे अवघड होत आहे. त्यामुळे वाढीव निधी ५ लाख रुपये इतका देण्यात यावा. अशी जनहिताची मागणी लोक प्रहार संघटनेतर्फ करण्यात आली आहे.

अगोदरच लाभार्थी आर्थिक अडचणीत आहेत. आणि अशातच लातूर मनपा आयुक्त /उपायुक्त यांनी सध्या नवीन अट लावलेली आहे की, अगोदर पाणीपट्टी कर, मालमत्ता कर भरल्यानंतरच लाभार्थी यांचे हफ्ते दिले जाणार अशी अट लावलेली दिसत आहे. अगोदरच्या प्रशासकीय काळातील कोणत्याही आयुक्त /उपायुक्त यांनी अशी अट लावलेली नव्हती. असे लोक प्रहार संघटनेचे म्हणणे असून अगोदर लातूर शहरातील नागरी वस्त्याना सोई सुविधा द्या. व स्वछतेचा प्रश्न, आरोग्याचा प्रश्न सोडवावा. या सर्व वरील प्रश्नावर *लोकप्रहारसंघटनेच्या . निवेदनातील मागण्यांचा एक महिन्यात जर विचार नाही केला गेला तर लोक प्रहार संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला. निवेदन देतेवेळी अजयसुर्यवंशी लोकप्रहार संघटनामहाराष्ट्रराज्यसंस्थापक अध्यक्ष, व रोहित सोनवणे युवा जिल्हाध्यक्ष, लालासाहेब सोनवणे, रवि मस्के, निखिल कोलते, दगडू गायकवाड, बालाजी जाधव, राहुल आखाडे, सचिन इचके, युवराज गुंजुटे , रवींद्र सोनवणे, जयपाल लोखंडे, अभि रसाळ, अन्य पदाधिकारी उपस्थित होते.


## CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY NAME FROM SANDIPAN SURESH YERANALE TO SANDIPAN SURESH YERNALE HENCE FOR THIS DECLERETION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE SANDIPAN SURESH YERNALE IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY WIFE, CHILDREN AND FAMILY.

OLD NAME: SANDIPAN SURESH YERANALE

NEW NAME:-SANDIPAN SURESH YERNALE

ADD: SHABITWADI, TQ. NILANGA SABITWADI, PO/ HARI JAVALGA, DIST LATUR, MAHARASHTRA-413607


# वाशीत जिजामाता कॉन्व्हेंट स्कूल चा वार्षिक सोहळा संपन्न.



नवी मुंबई / के. एच. हनवते:– जिजामाता माध्यमिक कॉन्व्हेंट स्कूल आणि ज्युनियर कॉलेज चा वार्षिक सोहळा नुकताच वाशीतील विष्णुदास भावे नाट्यगृहात मोठ्या उत्साहात पार पडला विद्यार्थ्यांच्या कलागुणांवर व कर्तुत्वावर प्रकाश टाकणारा हा कार्यक्रम संस्कृती शिक्षण आणि मनोरंजन यांचा उत्तम मिलाफ होता कार्यक्रमाची सुरुवात गजानन चॅरिटेबल संस्थेचे सचिव डॉ. व्ही.टी. पाटील आणि प्रमुख पाहुण्या सायली शिंदे, सामाजिक कार्यकर्ते मा. दिनेश पारेख, मा. अरुण पडते, आरपीआय आठवले गटाचे युवा प्रदेश उपाध्यक्ष मा. नारायण मोरे, संस्थेचे अध्यक्ष मा. महेश पाटिल, खजिनदार योगेश पाटील यांच्या हस्ते पारंपरिक दीप प्रज्वलनाने झाली. मुख्याध्यापीका सपना विनोद गुप्ता यांचे स्वागत पर भाषण झाले या कार्यक्रमाचे वैषिटय म्हणजे विदयार्थ्यांच्या सुंदर नृत्य सादरीकरणाची मालिका विविध सांस्कृतिक थीम दर्शविणारी प्रेक्षकांना त्यांच्या कृपेने आणि ऊर्जेने मंत्रमुग्ध करणारी प्रत्येक कामगिरीला टाळ्यांचा कडकडाट देऊन गेली तरुण कलाकार आणि मार्गदर्शकांचे कठोर परिश्रम आणि समर्पण प्रतिबिंबित करीत होते याशिवाय राजमाता जिजाऊ कॉमर्स अँड नाईट कॉलेज ऐरोलीचा दीक्षांत समारोह हा महत्वाचा भाग होता. पदवीधर विध्यार्थ्यांना स्मृती चिन्ह व पदवी देऊन गौरवण्यात आले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE